# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.३८२४/२४/अ.क्र.८१२७/२५

**Mr.Rafique Rahemtullah Kabani**

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) एच/प.विभाग प.उ. ०१
बृ.मुं.म.पा. उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) प.उ.-१ यांचे कार्यालय
हिंदू हृदय सम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे मंडई,
जे.व्ही.एल.आर. समोर, पूनम नगर, जोगेश्वरी (पू.), मुंबई-४०० ०९३.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/प. विभाग प.उ.-०१
बृ.मुं.म.पा. उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) प.उ.-१ यांचे कार्यालय
हिंदू हृदय सम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे मंडई,
जे.व्ही.एल.आर. समोर, पूनम नगर, जोगेश्वरी (पू.), मुंबई-४०० ०९३.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.११.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ११.०३.२०२४ | १२.०९.२०२४ | ०६.०५.२०२४ | २४.०७.२०२४ |

प्रस्तुत प्रकरणी आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हजर नाहीत. तथापि, प्राधिकरणाच्या वतीने अपिलार्थींच्या दि.११ मार्च, २०२४ रोजीच्या जोडपत्रामध्ये शिवांजली कॉ.ऑ.हौ.सो., आंबेडकर मार्ग, खार (प.), मुंबई-५२ या बाबतीत मागितलेल्या ५ मुद्यांच्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जामध्ये विचारणा करण्यात आलेली धारिका (CE/4362/BSII, AH) ही निरीक्षणाकरीता उपलब्ध असून अपिलार्थींनी ही माहिती प्राप्त झाली नसल्याचा आक्षेप अपिलीय सुनावणी दरम्यान नोंदविलेला आढळून येतो.

अपिलार्थींना उपरोक्त धारिणीचे निरीक्षण देण्यात आले असून त्यांच्याच माहितीनुसार सदर इमारती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अखत्यारित असल्याने कार्यकारी अभियंता (इ.प्र.) एच विभाग येथे एस.आर.ए. बाबतीतला कुठलाही प्रस्ताव कार्यालयात उपलब्ध नसल्याचे नमूद करीत अपिलीय अधिकाऱ्यांनी अपिल अर्ज निकाली काढला. तथापि, दि.११.०३.२०२४ रोजी सादर केलेल्या अर्जामध्ये मुद्देनिहाय

माहितीबाबतचा अहवाल स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्याचे निर्देश देखिल यात दिलेले आहेत. या अनुषंगाने दि.१२ सप्टेंबर, २०२४ रोजी जन माहिती अधिकारी (इ.प्र.) प.उप.-१ यांनी या संदर्भात अपिलार्थींना अपिलीय आदेशाचे अनुपालन करीत असल्याचे पत्र देखिल पाठविले असून प्रस्तुत द्वितीय अपिल अर्जात कुठलीच माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी या आधीच दिलेला प्रतिसाद तसेच अपिलीय अधिकाऱ्यांनी पारित केलेला ओदश हा स्वयंस्पष्ट असून अपिलार्थींना अपेक्षित असलेली माहिती व इमारती बाबत असलेला प्रस्ताव ही बाब प्राधिकरणाच्या अखत्यारीत नसल्याने जन माहिती अधिकाऱ्यांनी वस्तुस्थितीवर आधारित माहिती अपिलार्थींना कळविली असून अपिलीय अधिकाऱ्यांनीही त्याचे अनुमोदन केले असल्याचे आढळून येते. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २४-११-२०२५**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra

jyotsna